**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २६२** **दिनांक :- २१/०९/२०२१**

# आई-वडीलांवर प्राणघातक हल्ला करुन आईचा खून करुन दोन वर्षापासून फरार असणा-या आरोपीतास नालासोपारा पोलीसांनी केले जेरबंद.

नालासोपाला पोलीस ठाणे येथे गु.र.नं ३७/२०१९ भादंवि कलम ३०२, ३०७ प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपी नामे जन्मेश नरेंद्र पवार, रा. सी/२०२, इम्पेरियल टॉवर, पाटणकर पार्क, नालासोपारा पश्चिम याने दिनांक २९/०१/२०१९ रोजी त्याचे वडीलांसोबत मार्केटिंगच्या पैशाच्या व्यवहारावरुन मनात राग ठेवून त्याचे वडील व यातील फिर्यादी श्री. नरेंद्र रामचंद्र पवार वय ५३ व त्याची आई सौ. नम्रता नरेंद्र पवार वय ५० वर्षे हे घरात झोपलेले असतांना त्यांना लोखंडी हातोडीने डोक्यात गंभीर वार करुन चाकुने व स्क्र ड्रायव्हरने वार करुन त्यांना गंभीर दुखापती केल्या होत्या. त्यामध्ये सौ. नम्रता नरेंद्र पवार हया मयत झाल्या होत्या व श्री नरेद्र पवार हे गंभीर जखमी झाले होते. यातील आरोपी हा गुन्हा घडल्यापासून आतापावेतो फरार होता. त्यामुळे सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून त्यास अटक करणेकामी वरिष्ठांनी आदेशीत केलेले होते. त्याअनुषंगाने वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनानुसार नालासोपारा पोलीसांना यातील आरोपीचा वेगवेगळया मार्गाने माहिती काढून शोध घेतला.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असतांना नालासोपारा पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, यातील आरोपी नामे जन्मेश पवार हा कोलकत्ता राज्य पश्चिम बंगाल येथे असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने व वरिष्ठांचे परवानगीने नालासोपारा पोलीस स्टेशनचे सपोनि. श्री. अमोल तळेकर, पोना आदिनाथ कदम, पोना. सचिन कांबळे यांना कोलकत्ता, राज्य पश्चिम बंगाल येथे पाठविण्यात आले होते. सदरील तपास पथकाने कोलकत्ता येथे जावून स्थानिक पोलीसांचे मदतीने यातील आरोपीताचा कसोशिने शोध घेवून त्यास ताब्यात घेतले आहे. सदर आरोपी नामे जन्मेश नरेद्र पवार यास वरील गुन्हयामध्ये अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढिल तपास सपोनि. श्री. किशोर माने हे करित आहे.

सदरची कारवाई श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, श्री चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहूल सोनावणे, पोलीस निरीक्षक, सपोनि. श्री. अमोल तळेकर, पोना आदिनाथ कदम, पोना. सचिन कांबळे यांनी केली आहे.